ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख १७ जानेवारी, १९५१ अंक ३

## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

स्थापना–१९१७

| फोन | तारेचा पत्ता | पोस्टबॉक्स |
|---|---|---|
| नं. २४८३ | " Cencobank " | नं. ५११ |

मुख्य कचेरी–लक्ष्मी रोड, पुणें शहर.
शहर शाखा : डेक्कन जिमखाना, सर परशुराम-भाऊ कॉलेज, फर्ग्युसन कॉलिज, सेव्हिंग बँक सेक्शन.

—: शाखा :—

जुन्नर, खेड, दौंड, इंदापूर, सासवड, घोडनदी, बारामती, निरा, मंचर, भोर व पौड

—:बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात:—
जास्त माहितीसाठी लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रबडे
मॅनेजिंग डायरेक्टर

## दि रत्नाकर बँक, लि.

( कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली )
स्थापना : १९४३

मुख्य कचेरी : भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर
शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,००० |
| रिझर्व्ह फंड | ... | ५१,००० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. बी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन
श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा,
B. Com., C. A. I. I. B,
मॅनेजर

व्यापारी व कारखानदार
यांचे प्रश्न सोडविण्यास मदत करूं व सल्ला देऊं.
— ३० वर्षांचे अनुभवी. —

कंपनी कायदा व मॅनेजमेंट, रेकार्डस्, ऑफिस मॅनेजमेन्ट व आर्गनायझेशन कॉस्टिंग्ज्, व्यापारी व ऑफीस चार्टस्, वगैरे कामें माफक फी घेऊन करून देऊं. लिहा:—

जी. के. ॲण्ड सन्स,
विद्यामंदिर, मुंबई २४.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—
१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉम्पेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :
ब्रँच सेक्रेटरी.

—सर्व प्रांतांतील— सुती–गरम–रेशमी —खादींचें माहेरघर—

## खादी मन्दिर

१६१, बुधवार पेठ
डमढेरे बोळाजवळ,
पुणें १.

**दळणाच्या चक्क्या–टूल ग्राइंडर्स**
**मशीन टूल्स**
कडचा कापण्याचीं यंत्रें—करवत मशीन्स.
या मालाबद्दल आमचेकडे चौकशी करण्यास विसरूं नका.
**केळकर बंधू, लक्ष्मी रोड, पुणें शहर.**

## विविध माहिती

**सुताच्या निर्यातीला परवाने नाहींत**—भारतीय सरकारच्या व्यापार खात्यानें एक पत्रक काढून सुताच्या गांठीच्या निर्यातीला पूर्णपणें बंदी केली आहे. ह्यापूर्वी ३२ नंबरापर्यंतच्या सुताच्या निर्यातीला बंदी करण्यांत आलेली होतीच. आतां कोणत्याच नंबराचें सूत निर्यात करण्यासाठीं परवाने देण्यांत येणार नाहींत. हातमाग–विणकरांना सुताचा पुरवठा होत नसल्यामुळें ही निर्यात-बंदी अंमलांत आणली आहे.

**पेनिसिलिनचें आवरणच अधिक महाग**—सध्यां पेनिसिलिन हें औषध ज्या आवरणामधून विकण्यांत येतें त्याची किंमत औषधाच्या किंमतीपेक्षां अधिक असते असें सर अलेक्झांडर फ्लेमिंग ह्यांनीं सांगितलें. पेनिसिलिनच्या शोधाचे ते जनक आहेत. अगदी प्रारंभीं त्यांनीं हें औषध तयार करण्यासाठीं दुधाच्या बाटल्या वापरल्या होत्या. आतां १५,००० गॅलनच्या टाक्या औषध तयार करण्यासाठीं वापरण्यांत येतात. येवढ्या मोठ्या प्रमाणावर आतां हें औषध तयार करण्यांत येतें.

**घड्याळाच्या मनोऱ्यासाठी देणगी**—बनारस येथील काशी विश्वेश्वराच्या मंदिरापुढें घड्याळाचा मनोरा बांधण्यासाठीं शेठ रामकृष्ण दालमिया ह्यांनीं देणगी दिली आहे. ह्या मनोऱ्याचा चौथराच ३० फूट उंचीचा आहे. मनोऱ्याच्या बांधकामास प्रारंभ झाला असून तो सहा महिन्यांत पुरा होईल असा अंदाज आहे.

**आपद्ग्रस्तांना तांतडीनें मदत**—काश्मीर आणि प. पंजाबमधील पुरांत वाताहात झालेल्या आपद्ग्रस्तांना ४ टन अन्नाचा पुरवठा विमानानें करण्यांत आला, असें अमेरिकन सरकारनें जाहीर केलें आहे. अन्नाशिवाय मुलांचें कपडे, पांघरुणे व औषधें, इत्यादींचाहि पुरवठा करण्यांत आला. मदतींत नॅशनल कॅथॉलिक वेलफेअर कॉन्फरन्स ह्या खाजगी संस्थेचाही हात होता.

**मार्शल स्टॅलिन आणि योगी**—सुप्रसिद्ध योगी एल. एस. राव हे लवकरच अमेरिकेला व नंतर रशिआला जाणार आहेत असें समजतें. रशिआचे मुख्य प्रधान मार्शल स्टॅलिन ह्यांची भेट श्री. राव हे घेणार आहेत. श्री. राव हे कांच खाणें, ॲसिड पिणें, इत्यादि चमत्कार करून दाखविण्यांत पटाईत आहेत. १९५२ च्या आक्टोबर महिन्यांत महायुद्ध सुरू होईल असें भविष्य त्यांनीं वर्तविलें आहे.

**मालेगांव येथें सुताचा कारखाना**—नाशिक जिल्ह्यांतील मालेगांव येथें एक सुताचा कारखाना काढण्याचें व्यापारी-मंडळीनें ठरविलें आहे असें समजतें. ह्या कारखान्यासाठीं १० लाख रुपयांचें भांडवल उभारण्यांत येणार आहे. सहकारी पद्धतीवर एक खाजगी कारखानाही मालेगांवला निघणार आहे असें म्हणतात.

**पुणें–बेळगांव विमानाचा प्रवास**—एअर सर्व्हिसेस ऑफ इंडिआ ह्या कंपनीनें मुंबई–पुणें–बेळगांव ह्या मार्गावर एक विमान सर्व्हिस चालू करण्याचें ठरविलें आहे. विमानें मंगळवार, गुरुवार व रविवार ह्या तीन दिवशीं मुंबईहून निघतील. सकाळीं ७–४० ला मुंबईहून पुण्याला येऊन ८ वाजतां तीं पुढें बेळगांवाला जातील. बेळगांवला पोचण्याची वेळ सकाळीं ९–१० ही आहे.

**कापसाच्या लागवडींत वाढ**—१९५०–५१ सालच्या कापसाच्या लागवडीसंबंधीं भारतीय सरकारच्या शेतकी खात्यानें अंदाज प्रसिद्ध केला आहे. ह्या नाव्या अंदाजाप्रमाणें कापसाची लागवड १,००,४७,००० एकर जमिनींत करण्यांत आली आहे. गेल्या वर्षीच्या दुसऱ्या अंदाजाप्रमाणें ९१,३३,००० एकर जमिनींत लागवड झाली होती. गेल्या तीन वर्षांचा अनुभव असा आहे कीं, अखेरच्या अंदाजांत कापसाची लागवड ३३ टक्क्यांनीं अधिक असलेली आढळते.

**सूक्ष्म कार्य करणारीं यंत्रें**—संयुक्त प्रांत सरकारनें परकीय तज्ज्ञांच्या मदतीनें सूक्ष्म कामें करणारीं यंत्रें तयार करण्याचा कारखाना काढला आहे. ह्या कारखान्यांत आतांपर्यंत ४,५०० पाणी मोजण्याचे मीटर्स तयार झाले. वर्षअखेर १८,००० मीटर्स तयार होतील असा अंदाज आहे. नोव्हेंबर १९५० अखेर कारखान्यासाठीं सरकारला ७,७८,६०२ रुपये खर्च आला. गेल्या वर्षी कारखान्यांत २०० सूक्ष्मदर्शक यंत्रें, १००० ध्वनिक्षेपक, २,४०० रेडिओ सेट्स, १२५० थर्मामीटर्स आणि ६,००० वैद्यकीय पिचकाऱ्या तयार झाल्या. अशा प्रकारचा कारखाना भारतांत हा एकच आहे.

**शिरगणती व पदकें**—येत्या फेब्रुआरींत होणाऱ्या शिरगणतींत चांगलें काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना व मोजणीदारांना पदकें देण्याला भारताच्या अध्यक्षांनीं मंजुरी दिली आहे. प्रत्येक राज्य सरकाराला १ लाख लोकसंख्येमागें ३ पदकें मध्यवर्ती सरकारकडून पुरविण्यांत येणार आहेत. स्वतः राज्य सरकारें चांगल्या कामाबद्दल पदकें देतील तीं वेगळींच.

**व्यवसायावरील कर**—बनारसच्या नगरपालिकेनें वकील, डॉक्टर्स आणि वेश्या ह्यांच्यावर व्यवसाय–कर बसविण्याचें ठरविलें आहे. त्याचप्रमाणें ४० मैलांहून अधिक दूर असलेल्या ठिकाणापासून बनारसमध्यें येणाऱ्या प्रवाशांवरही कर बसविण्याचें ठरलें आहे. विड्याचीं पानें, वंगणाचें तेल, कांहीं यांत्रिक भाग, इत्यादींचा समावेश कर–पात्र वस्तूंत करण्यांत आला आहे.

**'रीडर डायजेस्टचा' उगम**—डेविट वॅलेस नांवाचा एक अमेरिकन सैनिक युद्धांतील जखमांमुळें इस्पितळांत पडून होता. त्या वेळीं इतर नियतकालिकांतील मजकूर निवडून थोडक्यांत देण्याची कल्पना त्याला सुचली. हाच 'रीडर्स डायजेस्टचा' उगम. आज या मासिकाच्या १·१ कोटी प्रती खपतात; निरनिराळ्या १६ भाषांतून त्याच्या आवृत्ती निघतात. आंधळ्यांना ज्ञान मिळावें म्हणून त्याची रेकार्डची आवृत्ति काढण्यांत येते.

**ब्रिटनमधील चित्रपटाचा धंदा**—लंडन टाइम्सनें ब्रिटनमधील १९५० सालच्या चित्रपटांचा आढावा घेतला आहे. मुख्य नट अमेरिकन घेऊन चित्रपट काढण्याच्या प्रथेला टाइम्सनें नांवें ठेविलीं आहेत. अशा चित्रपटांमुळें इंग्रजी भाषा अर्धी अमेरिकन पद्धतीची व अर्धी ब्रिटिश पद्धतीची बोलली जाते असा टाइम्सचा आक्षेप आहे. गेल्या वर्षी चार्ली चॅपलीनचा 'सिटी लाइटस्' हा चित्रपट नव्यानें दाखविण्यांत आला आणि तोच सर्वांत यशस्वी ठरला.

# अर्थ

बुधवार, ता. १७ जानेवारी, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## मोटार व्हिईकल्स् टॅक्सेशन कमिटीचा अहवाल

मोटारी व तत्सम वाहानें यांवर हल्लीं मध्य व राज्य सरकारांकडून अनेक प्रकारें कर बसविला जातो, त्यामुळें मोटारींना वहातुकीचें साधन या नात्यानें डोईजड कर भरावा लागतो. मोटारींवर बसविल्या जाणाऱ्या निरनिराळ्या करांच्या बाबतींत विचार करून कर-पद्धति सोईस्कर व सुसह्य व्हावी या उद्देशानें सूचना करण्यासाठीं हिंद सरकारनें गेल्या एप्रिलमध्यें मोटार व्हिईकल्स टॅक्सेशन इन्कायरी कमिटी नेमिली होती. या कमिटीनें आपला विचारपूर्ण अहवाल नुकताच सादर केला आहे. कमिटीनें विक्री-कर, ऑक्ट्रॉय ड्यूटी, टर्मिनल टॅक्स इत्यादि सर्व स्थानिक स्वरूपाचे कर रद्द करण्यांत यावे अशी सूचना केली आहे. सर्व राज्यांनीं किंवा प्रांतांनीं, हिंदमधील आंतरप्रांतीय दळणवळण सहजसुलभ व कमी खर्चाचें व्हावें या दृष्टीनें, एकमतानें मोटारींवर कर बसविण्याची पद्धति सुरू करावी असें सुचविलें आहे. पेट्रोलवर निरनिराळ्या राज्यांत स्वतंत्रपणें कर घेतला जातो त्या ऐवजीं दर गॅलनमागें सरसकट सहा आणे याप्रमाणें मध्य सरकारनें सर-चार्ज वसूल करावा अशी कमिटीची सूचना आहे. पेट्रोलवर असणारा उत्पादनावरील कर व कस्टमची जकात हे दोनहि सध्यांप्रमाणेंच चालू राहावें, परंतु यापैकीं दर गॅलन मागें ४॥ आणे स्टेट्स्-रोड-फंडाकडे जमा केले जावे. स्टेट्स् रोड फंडाकडे जमा होणाऱ्या रकमांचा विनियोग त्या त्या राज्यांत रस्त्यांची वाढ व दुरुस्ती यासाठीं करण्यांत यावा. या फंडामध्यें वर उल्लेखिलेल्या दोन प्रकारचे कर मध्य सरकारकडून जमा केले जावे; व निरनिराळ्या प्रांतिक सरकारांनीं मोटारी व मोटारींचे सुटे भाग यांवरील विक्रीकरापासून येणारा पैसा व कमिटीनें ठरवून दिल्याप्रमाणें मोटार व्हिईकल टॅक्सची रक्कम या दोन गोष्टींपासून येणारा कर बसवावा व तो सर्व रोड-फंडाकडे जमा व्हावा.

कमिटीनें सुचविलेल्या वरील स्वरूपाच्या नवीन करयोजनेचा उद्देश असा दिसतो कीं हिंदमध्यें रस्ते बांधण्याच्या कार्यक्रमाला चालना मिळावी व मोटारींवर बसणारा करांचा एकंदर बोजा कमी व्हावा अशा दुहेरी स्वरूपाचा आहे. कमिटीनें सुचविलेली योजना जशीच्या तशीच अंमलांत आणली जावी असा कमिटीचा कटाक्ष आहे व म्हणूनच कर-पद्धति व रस्त्यांचा विकास या दोनही गोष्टी एकाच वेळीं साध्य झाल्या पाहिजेत असा कमिटीचा आग्रह आहे. यापैकीं कोणतीही योजना अंशतः स्वीकारून कार्यभाग होणार नाहीं.

रेल्वे व मोटारींचे रस्ते यांच्या बाबतींत सध्यां हिंदमध्यें वहातुकीसाठीं स्पर्धा नाहीं असें सामान्यपणें मानावयास हरकत कांहींच नाहीं. अशी स्पर्धा किंचित असलीच तर ती रेल्वे व मोटारी यांच्या दरम्यान मालाच्या वहातुकीच्या बाबतींत अनुक्रमें १०० ला १·६ या प्रमाणांत आहे. तेव्हां कमिटीला रस्त्यांच्या विकासाच्या दृष्टीनें कर-पद्धति सुचवावयाची असल्यामुळें अशी मारक स्पर्धा सध्या नाहीं असेंच कमिटीचें मत असावें असें दिसतें. सध्यां मोटारी वापरणारांना वाजवीपेक्षां जास्त करभार सहन करावा लागतो व हें करांचें फाजील दडपण दूर करावें अशीहि वरील करविषयक सूचना करण्यांत कमिटीची दृष्टि असावी. मोटारींच्या कराच्या बाबतींत सध्यांची विसंगति म्हणून असें म्हणतां येईल कीं मद्रासमध्यें दर मोटारी मागें वार्षिक रु. ७१० कर भरावा लागतो, तर मुंबईमध्यें हें प्रमाण रु. ३१३ व दिल्ली शहरांत रु. ७८ आहे. अशा तऱ्हेची विसंगति दूर करणें हा कमिटीच्या सूचनांचा एक निश्चित उद्देश आहे. सध्यां मध्य सरकारलाच मोटारींच्या करांपासून जास्त उत्पन्न मिळतें, परंतु रस्ते बांधण्याची जबाबदारी मात्र प्रांतिक व राज्य सरकारांवर येते. हीहि विसंगति कमिटीच्या सूचनांनीं दूर करण्याचा प्रयत्न केला आहे. १९४८-४९ सालीं मध्य सरकारकडून रस्त्यांच्यावर सुमारें रु. २ कोटी, ३४ लक्ष रक्कम खर्ची पडली, परंतु त्याच वर्षीं राज्य किंवा प्रांतिक सरकारांनीं याप्रीत्यर्थ रु. १४ कोटी खर्च केला. परंतु याच वर्षीं निरनिराळ्या करांच्या रूपानें मध्य सरकारला मोटारींकडून रु. १४ कोटींहून जास्त रक्कम मिळाली तर प्रांतिक सरकारांना फक्त या प्रकारें रु. ७ कोटींच प्राप्ति झाली होती.

यापुढें हिंदमध्यें रस्त्यांचा विकास व्हावयाचा म्हणजे १९४३ ची "नागपूर योजना" अंमलांत आली पाहिजे. या योजनेप्रमाणें रस्त्यांच्या बांधकामासाठीं खर्च करावयास झाल्यास, हल्लींच्या वाढत्या किंमती प्रमाणें हिशेब केल्यास निदान रु. ७५० कोटी कांहीं वर्षांत खर्चावे लागतील. इतका प्रचंड खर्च रस्ते वाढविण्यासाठीं करतां येईल कीं नाहीं हें सांगणें कठीण आहे. परंतु कमिटीच्या सूचनांचा उद्देश अशा स्वरूपाचा खर्च कांहीं प्रमाणांत तरी करतां येणें शक्य व्हावें असा असावा असें दिसतें. मोटारींच्या जास्त प्रमाणांत उपयोगाची प्रगति होतांना सामान्यतः १५० मैलांच्या अंतरांतील दळणवळणाच्या बाबतींत वाहून नेण्यासाठीं जास्त प्रमाणांत माल किंवा उतारू यांची वाहतूक साध्य करणें ही गोष्ट साधणें आवश्यक आहे व तिची शक्यता मोटारींवर बसविण्यांत येणाऱ्या निरनिराळ्या करांचें दडपण कमी होण्यावरच अवलंबून आहे. कमिटीच्या सूचनांमुळें हाहि उद्देश सफळ होणें शक्य आहे.

वहातुकीच्या मार्गांच्या व साधनांच्या बाबतींत पूर्ण स्वातंत्र्य असावें म्हणजेच कार्यक्षमता निर्माण होईल. कमिटीचा दृष्टिकोन अशाच स्वरूपाचा असून शक्य तितक्या कमी सरकारी नियंत्रणानें हिंदमध्यें मोटारींचा प्रसार व रस्त्यांची वाढ साध्य व्हावी असा सूचनांचा गर्भितार्थ दिसतो. मोटारींवर करांचें दडपण प्रमाणाबाहेर जास्त असण्याचें एक महत्त्वाचें कारण हें कीं, आतांपर्यंत मोटारींचे सुटे भाग व पेट्रोल यांची आयात मोठ्या प्रमाणांत होत आहे. या धंद्याची मालकी हिंदी जनतेच्या हातांत येईल तर मोटारींवरील कर-भार आपोआपच हलका होईल. एकंदर कमिटीच्या कर-विषयक सूचना आमूलाग्र व स्वागतार्ह आहेत.

## पोस्ट व तार खात्याचा वार्षिक अहवाल

१९४९–५० या कालावधींत पोस्ट कचेऱ्यांनीं २,१६६ दशलक्ष वस्तूंची उलाढाल केली, त्यांमध्यें ७३·७ दशलक्ष रजिस्टर्ड वस्तू होत्या. १९४८–४९ चे आंकडे अनुक्रमें २,२६४ व ७२.२ दशलक्ष होते. या वर्षांत एकंदर १६० कोटी रु. किंमतीच्या ४,८३,००,००० मनी–ऑर्डरी झाल्या. मागील वर्षीं १५० कोटी रु. किंमतीच्या ४,४९,००,००० म. ऑ. झाल्या होत्या. १९४८–४९ सालीं २७·१ दशलक्ष तारा करण्यांत आल्या होत्या. अहवालाच्या वर्षी ही संख्या २६·२ दशलक्ष होती. एकंदर ५·२ दशलक्ष टेलिफोन ट्रंक कॉल्स झाले. मागील वर्षीं ४.४ दशलक्ष झाले होते. १९४९–५० च्या अखेरीस भारतांत एकंदर १,४०,००० टेलिफोन होते.

### उत्पन्न व खर्च

खात्याचें उत्पन्न ३३,३६,५०,०८१ रुपये आणि खर्च ३१,२५,५९,३१५ झाल्यामुळें २,४०,९०,७६६ रु. नफा झाला. मागील वर्षीं हें आंकडे अनुक्रमें २९,४७,६७,२५६ रुपये, २६,८८,९१,२३४ रुपये आणि २,५८,७६,२९२ रु. होते. भत्त्यांतील वाढ, टेलिफोन विकास निधीसाठीं रकमेची तरतूद, पगारांतील वाढ, रेल्वे व विमान कंपन्या यांना मदत वगैरे स्वरूपाच्या खर्चांतील वाढ, हिशेब तपासनीसांच्या आकारांत वाढ यामुळें एकंदर खर्चांत वाढ झाली. नोकरवर्गाला दिलेल्या खास सवलतींकरतां ७·८४ लक्ष रुपये खर्च झाले.

तारा आणि टेलिफोनच्या बाबतींतील बराचसा भांडवली खर्च मुख्यत्वें ट्रंक व स्थानिक टेलिफोनच्या लाइन्स टाकणें, आणि जनतेची टेलिफोन व तारांची अधिक सोय व्हावी म्हणून नव्या टेलिफोन एक्सचेंजिस, यांसारख्या नवीन योजनांवर करण्यांत आला.

१ एप्रिल १९४९ पासून अंतर्गत पत्रांच्या टपालाचा दर दीड आण्यावरून दोन आणे करण्यांत आला आणि पोस्ट कार्डाची किंमत ६ पैची ९ पै करण्यांत आली. विमानटपालासाठीं घेण्यांत येणारा जादा आकार रद्द करून सर्वच टपाल विमानानें नेण्याची पद्धति सुरू करण्यांत आली. या पद्धतीप्रमाणें विमानाची सोय असलेल्या ठिकाणीं पाकिटें व कार्डें सर्वच्या सर्व किंवा कांहीं प्रमाणांत विमानानें पाठविलीं जातात. याबरोबरच रात्रीच्या विमान टपाल वहातुकीमुळें वेळेची मोठी बचत होऊन जमिनीवरून टपाल नेण्यास लागणाऱ्या वेळाच्या फारच अल्प वेळांत टपाल पोहोंचूं लागलें. प्रत्यक्ष उदाहरणच द्यावयाचें तर, जेथें श्रीनगरहून त्रिवेंद्रमला पत्र पोहोंचण्यास जमीनमार्गें १६० तास लागत असत, तेथें आतां अवघे २० तास लागूं लागले. या पद्धतीमुळें अंतर्गत विमानमार्गानें जाणाऱ्या टपालांत बरीच वाढ झाली असून १९४८–४९ सालीं १३,९३,००० पौंड टपाल विमानांतून जात असे, त्याऐवजीं ५२,०८,७०० पौंड जाऊं लागलें.

३१ मार्च १९५० रोजीं भारतांत एकंदर २१,८४२ कायमच्या पोस्ट कचेऱ्या होत्या. १९४९ त त्या २०,५२५ होत्या. यांपैकी ३,९७७ शहरांत व १७,८६५ खेड्यांत होत्या. १९४९ त हेच आंकडे अनुक्रमें ३,८५१ व १६,६७४ होते. अहवालाच्या वर्षी ग्रामीण भागांत १,०३४ व शहरांत २०२ पोस्ट कचेऱ्या उघडण्यांत आल्या. ३१ मार्च १९४९ शीं तुलना करतां त्या वर्षाचे अखेरीस प्रत्यक्ष पोस्ट कचेऱ्यांच्या संख्येंत २,९२७ नीं वाढ झाली. आर्थिक अडचणीमुळें अधिक पोस्ट कचेऱ्या उघडतां आल्या नाहींत. फिरत्या पोस्ट कचेऱ्यांचे प्रयोग करून पाहण्यांत आले. नागपूर–वर्धा जिल्ह्यांत खेड्यापाड्यांसाठीं एक फिरती पोस्ट कचेरी आणि नागपूर शहरांत रात्रीची फिरती पोस्ट कचेरी सुरू करण्यांत आली होती. यांपैकीं पहिली कचेरी बंद करावी लागली; परंतु दुसरी चांगल्या प्रकारें चालू आहे.

### पोस्टाच्या तिकिटांतील बदल

राजाचा मुखवटा असलेल्या जुन्या पोस्ट तिकिटांऐवजीं पुराण वस्तूंचीं चित्रें असलेल्या नव्या तिकिटांची सुरुवात ही या वर्षांतील उल्लेखनीय गोष्ट आहे. सरकारी टपालाच्या तिकिटांवर राजाच्या मुखवट्याऐवजीं अशोकस्तंभाची प्रतिमा आली. याखेरीज, जागतिक पोस्ट संघाच्या ७५ व्या वाढदिवसानिमित्त आणि २६ जानेवारी या प्रजासत्ताक दिनाचे वेळीं खास तिकिटें काढण्यांत आलीं.

विमान मार्ग वगळले तर ३१ मार्च १९५० रोजीं १,४३,०८७ मैलांच्या मार्गांवर टपालाची ने–आण केली जात होती. यापैकी २४ टक्के टपाल रेल्वेनें, २३ टक्के मोटारींनीं, ५० टक्के नोकरांकरवीं, आणि बाकीचें ३ टक्के टपाल बोटी, बैलगाड्या, घोडे, उंट व एक्क्यांतून नेलें जात होतें.

### राष्ट्रीय बचत रोखे

१९४८–४९ त राष्ट्रीय बचत रोख्यांत लोकांनीं गुंतविलेली रक्कम २२·७ कोटी रु. होती. ती या वर्षी २३·८ कोटी रुपयांपर्यंत वाढली. बचत रोखे परत केल्यामुळें मागील वर्षी ७·२ कोटी रुपये फेड करण्यांत आले होते, तर यावर्षी ८·७ कोटी रु. द्यावे लागले. गुंतविलेल्या व फेड केलेल्या या रकमांतील वाढीस मुंबईच्या गिरणी कामगारांना बोनस देतांना ५ वर्षें मुदतीचे बचत रोखे देण्यांत आले होते व त्यांपैकीं बरेच लवकरच परत करण्यांत आले हें कारण आहे.

### हिंदी भाषेंत तारा

१ जून, १९४९ पासून देवनागरी लिपींतील हिंदी भाषेंतील तारांची सोय करण्यांत आली. ही व्यवस्था सध्यां फक्त आग्रा, अलाहाबाद, बनारस, गया, जबलपूर, कानपूर, लखनौ, नागपूर, पाटणा, बरेली, इंदूर आणि जयपूर या शहरांपुरतीच मर्यादित आहे.

### 'ओन युवर फोन' पद्धती

टेलिफोनच्या सोयींत वाढ होण्यास मदत होण्याच्या दृष्टीनें १९४९ च्या डिसेंबरांत 'ओन युवर फोन' पद्धति सुरू करण्यांत आली. या पद्धतीप्रमाणें टेलिफोन घेऊं इच्छिणाऱ्याला प्रथम २,००० ते २,५०० रु. (ही रक्कम शहरावर अवलंबून असे) ठेव ठेवावी लागते आणि त्यानंतर त्याला २० वर्षेंपर्यंत टेलिफोन बसवून मिळतो. त्याबद्दल त्याला दरमहा २ रु. टेलिफोन देखरेख खर्च आणि होणारा संदेश आकार भरावा लागतो. या पद्धतीमुळें मिळालेली रक्कम टेलिफोनच्या वाढीच्या कार्यक्रमास उपयोगी आली आहे. १९४९–५० मध्यें हंगेरीशीं रेडिओ–टेलिफोन व्यवस्था आणि नेपाळशीं टेलिफोनचें दळणवळण सुरू झालें. १७ नोव्हेंबर १९४९ रोजीं दिल्लीशीं संबंध ठेवतां यावेत म्हणून श्रीनगर येथें एक बिनतारी केंद्र सुरू करण्यांत आलें.

वर्ष अखेरीस या खात्यांत १,७५,०६६ कायम व ४९,७५२ तात्पुरता नोकरवर्ग काम करीत होता. स्त्री नोकरवर्गाची संख्या ३१ मार्च १९४९ रोजीं २,३६२ होती, ती २,६४६ पर्यंत वाढली आहे.

या खात्यांतील नोकरवर्गाच्या १९ अधिकृत अ. भा. संघटना होत्या व सर्व संघांची सदस्य संख्या ३१ मार्च, १९५० रोजीं १,२५,००० होती.

खात्याच्या नोकरवर्गाच्या सोयीसाठीं काम करणाऱ्या ४२ सहकारी पतपेढ्या अस्तित्वांत होत्या व त्यांची सदस्य संख्या ८५,५९५ होती. मागील वर्ष अखेरीस हे आंकडे ४१ व ७८,२१० होते.

## रशिआंतील औद्योगिक विकासाचा पाया

बंगलोर येथें नुकत्याच भरलेल्या सायन्स काँग्रेसला रशिआतर्फे शास्त्रज्ञांचें एक प्रतिनिधिमंडळ आलें होतें. ह्या मंडळाचे नेते, प्रो. बोगोमोलेव्ह ह्यांनीं काँग्रेसच्या भूगर्भ आणि भूगोल शाखेपुढें एक व्याख्यान दिलें. रशिआंत शास्त्रें आणि औद्योगिक विकास ह्यांची सांगड कशी घालण्यांत येते ह्या बाबीवर प्रो. बोगोमोलेव्ह ह्यांनीं आपल्या व्याख्यानांत चांगला प्रकाश पाडला. ते म्हणाले कीं, रशिआंतील लोक शांतताकालीन आर्थिक कार्यक्रमांत गढून गेलेले आहेत. उद्योगधंदे, वहातूक, शेती इत्यादि सर्वच बाबतींत हें खरें आहे. नेहमींच्या पद्धतीप्रमाणें सर्व कार्यक्रम योजनाबद्ध पद्धतीनें पार पाडण्यांत येत आहेत. ह्या कार्यक्रमांत भूगर्भ-संशोधनाला बरेंच महत्त्व देण्यांत आलेलें आहे. कारण, ह्या शास्त्रीय ज्ञानाशिवाय आर्थिक प्रश्न बरोबर रीतीनें सोडविले जाणार नाहींत. मध्यआशिआंतील तुर्कमेनिअन उपराज्यांतील मोठा भूप्रदेश लागवडीखालीं आणण्यांत येणार आहे. त्यासाठीं ७०० मैल लांबीचा मुख्य कालवा काढण्यांत येत आहे. त्याशिवाय कालव्यांचें पाणी जास्तींत जास्त जमिनींना मिळावें म्हणून ८०० मैल लांबीचे दुय्यम कालवे खणण्यांत येणार आहेत. पाटबंधाऱ्यांची हीं प्रचंड योजना पूर्ण झाली म्हणजे ८० लाख हेक्टर्स जमीन पाण्याखालीं भिजूं लागेल. ह्या योजनेच्या कामाला १९५१ मध्यें प्रारंभ करण्यांत येऊन ती १९५७ मध्यें पुरी होईल. कालव्याच्या पाण्याचा फायदा घेऊन सुमारें १२॥ लाख एकर जमिनींत फळझाडें लावण्यांत येतील. ह्या बागायतीमुळें वाळूची रेताड जमीन घट्ट होईल. दक्षिण युक्रेनमध्येंही अशीच एक मोठी पाटबंधाऱ्यांची योजना आंखण्यांत येणार आहे. ह्या योजनेंतील कालव्यांची लांबी ५०० मैल होईल आणि तीमुळें ८०,००० एकर जमिनीला पाणीपुरवठा होईल. स्टॅलिनग्रॅड व निलिशेव्ह ह्या शहरांजवळ विजेच्या उत्पादनच्या दृष्टीनें दोन मोठीं धरणें बांधण्यांत येणार आहेत. विजेच्या उत्पादनाच्या दृष्टीनें हीं धरणें जगांतील सर्वांत मोठीं होतील. १९१२ मध्यें रशिअन झारच्या राजवटींत जेवढी वीज सर्व धरणांवर उत्पन्न होत असे तितकी वीज हीं दोनच धरणें दरवर्षी निर्माण करतील. सोव्हिएट रशिआंतील उद्योगधंद्यांची वाढ आणि आधुनिक स्थापत्यशास्त्राचा उपयोग, ह्यामुळेंच अशीं विशाल धरणें बांधणें शक्य झालें आहे. सध्यां रशियांत जीं विद्युत्पादनाचीं केंद्रें बांधण्यांत येत आहेत तशा मनुष्यजातीच्या इतिहासांत पूर्वी कधींच बांधण्यांत आलेलीं नाहींत. सोव्हिएट भूगर्भशास्त्रज्ञांनीं ह्या धरणांच्या व इतर बाबतींत फार मोलाची मदत केली आहे. ह्याहिपेक्षां अधिक अवघड प्रश्न सोडविण्याचे प्रयत्न ते करीत आहेत. निसर्गाचा अभ्यास करून मनुष्याच्या उपयोगी पडतील असे फेरबदल त्यांत कसे घडवून आणावे इकडे सध्यां त्यांचें लक्ष लागलें आहे.

प्रो. बोगोमोलेव्ह ह्यांनीं दिलेल्या माहितीवरून रशिआंतील औद्योगिक घडामोडींवर तर प्रकाश पडतोच; पण आर्थिक उत्कर्षासाठीं जरूर असणारें मूलभूत संशोधन कशा प्रकारचें असतें तेंही लक्षांत येतें. भूगर्भशास्त्र आणि भूगोल यांचा संबंध मनुष्याच्या आर्थिक जीवनाशीं फार निकटचा आहे. भारतांत ह्यासंबंधींचें संशोधन अजून बाल्यावस्थेंत आहे. तेव्हां इतर देशांच्या ह्या क्षेत्रांतील अनुभव मार्गदर्शक होण्यासारखा आहे.


सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि.



(स्थापना १९१८)

बचतीच्या विविध योजना

हेड ऑफिस– गिरगांव, मुंबई.

शाखा: दादर, माहीम, बेळगांव


### भारतांतील वाचकांची बदलती अभिरुचि

मुंबईंतील ग्रंथविक्रेत्यांनीं पुस्तकांच्या खपाविषयीं आणि मागणीविषयीं एक अहवाल नुकताच प्रसिद्ध केला आहे. त्या अहवालावरून असें दिसून येतें कीं, युद्धोत्तर काळांत भारतांतील जनतेंत तांत्रिक आणि शास्त्रीय वाङ्मय वाचण्याची आवड वाढत चालली आहे. सामान्य वाङ्मय, नाटकें आणि कलाविषयक पुस्तकें ह्यावद्दलची आवड कमी झालेली दिसून येते. सर्वसाधारण वाचकाला केवळ कल्पनाजन्य वाङ्मयाचीच आवड अधिक दिसून येते. अशा वाङ्मयांत कादंबऱ्या, रहस्यकथा, गुप्त पोलिसांच्या गोष्टी, लघुकथा इत्यादींचा भरणा असतो. बहुसंख्य वाचक वेळ घालविण्याकरितां अगर मनोरंजनाकरितां वाचन करीत असल्यामुळें वरील वाङ्मयप्रकाराकडे त्यांचा ओढा असणें स्वाभाविक आहे. युद्धोत्तर काळांत वाचकांच्या अभिरुचींत पडलेला फरक आणि त्याची दिशा पुस्तकांच्या मागणीवरून दिसून येते.

युद्धोत्तर काळांत आंतरराष्ट्रीय प्रश्नांवरील पुस्तकांची मागणी भारतांत झपाट्यानें वाढूं लागली आहे. चीन, तिबेट, नेपाळ इत्यादि देशांतील घडामोडींविषयीं भारतांतील वाचकांची जिज्ञासा वाढूं लागली आहे. त्याशिवाय व्यावहारिक मानसशास्त्र आणि योगशास्त्र ह्या विषयावरील पुस्तकांची मागणीही वाढली आहे. राजकीय विषयावरील पुस्तकांत, पं. नेहरूंचीं पुस्तकें, मि. चर्चिल ह्यांच्या दुसऱ्या युद्धविषयक आठवणी, मि. गुंथर ह्यांनीं लिहिलेलें प्रे. रुझवेल्ट ह्यांचें चरित्र आणि एम्. स्टॅलिन ह्यांचें चरित्र ह्या पुस्तकांना विशेष मागणी असलेली दिसून येते. १९४९-५० सालीं ७६ लाख रुपये किंमतीचीं पुस्तकें भारतांत आयात करण्यांत आलीं. उलटपक्षीं भारतानें ३५ लाख रुपये किंमतीचीं पुस्तकें निर्यात केलीं. ह्यावरून विचारांच्या ह्या व्यापारांतही भारताची आयात निर्यातीपेक्षां अधिक आहे हें दिसून येतें. अलीकडील कांहीं वर्षांत भारतासंबंधीं अमेरिकेंत बरेंच कुतूहल निर्माण झालेलें आहे. त्याचा फायदा घेऊन येथील लेखकांनीं अमेरिकन जनतेची जिज्ञासा भागविणारें वाङ्मय निर्माण केलें तर व्यावहारिक दृष्टीनें तें महत्त्वाचें ठरेल. अमेरिकेंतील विद्यापीठांतून भारतासंबंधीं विशिष्ट विषयांची माहिती देणाऱ्या पुस्तकांचा संग्रह करण्यांत येत आहे.

### कृत्रिम रेशमाच्या धंद्यास संरक्षणाबाबत टॅरिफ बोर्डाकडून चौकशी

इंडियन टॅरिफ बोर्डानें मुंबई येथें ४ जानेवारी १९५१ रोजीं कृत्रिम रेशीम, कापूस आणि कृत्रिम रेशीम मिश्रित कापड धंद्यास ३१ मार्च १९५१ नंतरही संरक्षण देण्याच्या मागणीबाबत चौकशी केली. चौकशी मंडळांत बोर्डाचे अध्यक्ष डॉ. एच्. एल्. डे व सभासद डॉ. बी. व्ही. नारायणस्वामी नायडू यांचा समावेश करण्यांत आला होता. या धंद्याच्या संघटित विभागांत विजेवर चालणारे सुमारें २५ हजार माग व ७५ हजार हातमाग आहेत. या धंद्याची उत्पादनशक्ति विशेषत: १९४८ च्या चौकशीनंतर बरीच वाढली असून सुताच्या टंचाईमुळें प्रत्यक्ष उत्पादन मात्र उत्पादनशक्तीपेक्षां बरेंच कमी होत आहे.

## रिझर्व्ह बँकेनें एक्स्चेंज बँकेस दिलेलें कर्ज

### श्री. देशमुख ह्यांची हायकोर्टांत साक्ष

सिंधू सेटलमेंट्स कॉर्पोरेशननें तारण घेऊन एक्स्चेंज बँक ऑफ इंडिया अँड आफ्रिका (आतां लिक्विडेशनमध्यें असलेली) ह्या बँकेला कर्ज दिलेलें होतें. रिझर्व्ह बँकेनेंहि ८५ लक्ष रुपये कर्जाऊ दिलेले होते. रिझर्व्ह बँकेस दिलेली गहाण व बोजा सर्ते एक्स्चेंज बँकेवर बंधनकारक नाहींत, असा निवाडा मागणारा एक अर्ज एक्स्चेंज बँकेनें व सिंधू कॉर्पोरेशननें मुंबई हायकोर्टाकडे केला आहे. हायकोर्टांत ह्या प्रकरणीं अर्थमंत्री श्री. चिं. द्वा. देशमुख ह्यांची साक्ष झाली. रिझर्व्ह बँकेनें एक्स्चेंज बँकेला फेब्रुवारी–मार्च–एप्रिल १९४९ मध्यें कर्जें दिलीं, त्यावेळीं श्री. देशमुख हे रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते. रिझर्व्ह बँक कायद्याच्या १८ (१) कलमाप्रमाणें व्यवस्था करण्याचा विशेष प्रसंग उद्भवला असल्याचें त्यांचें मत झाल्यावरूनच त्यांनीं ह्या कर्जांना मंजुरी दिली असें त्यांनीं साक्षींत सांगितलें. करारपत्र आणि प्लेज व हाइपॉथिकेशनचे कागदपत्र ह्यांवर २२ फेब्रुवारी, १९४९ ही तारीख असली तरी प्रत्यक्ष सह्या त्या तारखेनंतर करण्यांत आल्याचें श्री. देशमुख ह्यांनीं मान्य केलें. गव्हर्नरनें मंजुरी दिल्यावर, तिच्या अंमलबजावणीच्या देखरेखीचें काम गव्हर्नराचें नसतें, असेंहि त्यांनीं सांगितलें. रिझर्व्ह बँकेच्या व्यवहाराच्या पद्धतीस हें धरूनच आहे. १० लक्ष रुपयांचें कर्ज वगळून बाकी सर्व कर्जांस त्यांची पूर्व-संमति घेतलेली होती. १० लाखांचें कर्ज दिलें तेव्हां ते मुंबईंत नव्हते, परंतु कामाच्या पुढच्याच दिवशीं ह्या कर्जास त्यांनीं मंजुरी दिली.

## मध्यवर्ती फिल्म सेन्सॉर बोर्ड

### तपासणी फींत ७००% वाढ

मध्यवर्ती फिल्म्स सेन्सॉर बोर्डाच्या कामास १५ जानेवारी, १९५१ पासून प्रारंभ झाला. प्रांतिक बोर्डांच्या आवडी–निवडींत भयंकर तफावत पडत असल्यामुळें चित्रपट निर्मात्यांची अत्यंत कुचंबणा होई. ती दूर करण्यासाठी सबंध भारतासाठी एकच मध्यवर्ती सेन्सॉर बोर्ड असावें, अशी चित्रपटधंद्याची दीर्घ काळ मागणी होती ती आतां पुरी झाली आहे. ह्या बोर्डाच्या कामकाजाचे नियम मात्र अद्याप प्रसिद्ध झालेले नाहींत. जुन्या प्रांतिक सेन्सॉर बोर्डांची तपासणी फी पूर्वीं प्रत्येक १,००० फूट फिल्मला ५ रु. असे, तिच्याऐवजी मध्यवर्ती सेन्सॉर बोर्ड ४० रु. फी आकारणार आहे. म्हणजे, तपासणी फींत ७००% वाढ झाली आहे. मध्यवर्ती बोर्डाचा खर्च तपासणी फींतून पूर्णत्वानें भागावा असा अर्थमंत्र्यांचा आग्रह होता असें म्हणतात. म्हणून त्या फींत एवढी वाढ झाली आहे. सबंध भारतांतील फिल्म सेन्सॉरशिपमध्यें एकवाक्यता यावी, ह्या दृष्टीनें भारत सरकारनें सात जणांचें सल्लागार–मंडळ नेमलें आहे. मुंबई, कलकत्ता आणि मद्रास येथेंहि प्रादेशिक सल्लागार मंडळांची नेमणूक करण्यांत आली आहे. सल्लागार मंडळांत प्रो. एम. आर. पाळंदे, मिसेस डी. एस. बखले, श्री. पां. वा. गाडगीळ इत्यादि सभासद आहेत.

### गिरण्यांना कपास कमी मिळणार

मुंबई व अहमदाबाद येथील गिरण्यांना त्यांच्या १९४७–४८ मधील मागणीच्या मानानें ७०% कपास मिळत असे; ती ह्यापुढें फक्त ६०% मिळेल, असें समजतें.

### बँक ऑफ महाराष्ट्र लि.

वरील बँकेस १९५० सालीं २,२९,६०१ रु. नफा झाला. करासाठीं १ लक्ष रु. ची तरतूद करून व ४६,००० रु. ची रिझर्व्ह फंडांत भर घालून ५% करमाफ डिव्हिडंड दिलें जाईल. नफ्याची रक्कम, रिझर्व्ह फंडाकडे वर्ग केलेली रक्कम, कराची तरतूद, पुढील वर्षांत ओढलेला शिल्लक नफा ह्या सर्व आकड्यांत वाढ दिसत आहे.

### सेंट्रल बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९५० मध्यें १ कोटि रुपये नफा झाला. गेल्या वर्षीच्या नफ्यापेक्षां हा नफा २२ लाखांनीं कमी आहे. डिव्हिडंडचा दर (१४%) कायम राहणार आहे.

### युनायटेड कमर्शिअल बँक लि.

वरील बँकेस १९५० मध्यें ३७,१७,६९७ रु. नफा झाला. दर भागास २ रु. करमाफ डिव्हिडंड देण्यांत येईल.

### बँक ऑफ इंडिया लि.

वरील बँकेस १९५० मध्यें ७५ लक्ष रुपये नफा झाला. १४% डिव्हिडंड कायम रहाणार आहे.

### बँक ऑफ बरोडा लि.

वरील बँकेच्या १९५० सालाचा नफा १९४९ चे मानानें ६ लाखांनीं कमी आहे. ३२॥ लक्ष रुपयांऐवजीं २६॥ लक्ष रु. नफा झाला. परंतु १२% डिव्हिडंड कायम राहणार आहे.

### २,१०० रु. पेक्षा ज्यास्त हुंडा नको.

बिहार प्रांतिक मारवाडी परिषदेची हुंडा–विरोधी खास बैठक पाटणा येथें भरली होती. हुंड्याची चाल अनावश्यक व अनिष्ट असून ती बंद केली पाहिजे, हें ध्येय परिषदेनें मान्य करून, सुरुवात म्हणून हुंड्याची कमाल रक्कम २,१०० रु. असावी असा ठराव केला आहे.

### फलटण शुगर वर्क्स लि.

दि फलटण शुगर वर्क्स लि. ला ३० सप्टेंबर, १९५० अखेर संपलेल्या वर्षी १६॥ लक्ष रुपये नफा झाला. त्यापूर्वीच्या वर्षी २३ लक्ष रुपये नफा झाला होता.

### पाकिस्तानांतील बँकिंग

पाकिस्तानांत सध्या बँकिंगचें जें काम इंपीरियल बँक ऑफ इंडियाकडे चालू आहे, तें सर्व तिच्याकडून काढून घेऊन नॅशनल बँक ऑफ पाकिस्तानला देण्याचा पाकिस्तान सरकार विचार करीत आहे. १ जुलैपासून हा बदल केला जाईल.

### भुइमुगाच्या प्रयोगावर ३६५ लक्ष पौंड वाया

पूर्व आफ्रिकेंतील ३६५ लक्ष पौंडांच्या खर्चाची आपली भुइमूग लागवडीची योजना ब्रिटिश सरकार सोडून देणार असल्याचें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे. हा प्रयोग यशस्वी होण्याची शक्यता उरलेली नाहीं. झालेला ३६५ लक्ष पौंडांचा खर्च बुडीत खर्च म्हणून समजावा लागेल.

### सावकारांचा लायसेन्स : नियम सोपा केला

सावकारांनीं आपला परवाना नवीन करून घेण्यासाठीं अर्ज करावयाचा, तो पहिल्या परवान्याची मुदत संपण्यापूर्वी दोन महिन्यांत केव्हांहि केला तरी आतां चालेल. पूर्वीं तो फक्त मे महिन्यांतच करता येई.

### रेल्वे स्टेशनांतून डॉ. राजेंद्रप्रसाद ह्यांचीं चित्रें

राष्ट्राध्यक्ष, डॉ. राजेंद्रप्रसाद, ह्यांच्या चित्राच्या २,००० प्रती विकत घेऊन त्या निरनिराळ्या रेल्वे स्टेशनांतून व रेल्वे कचेऱ्यांतून लावण्याचें रेल्वे बोर्डानें ठरविलें आहे. श्री. नागेश्वरराव ह्यांनीं काढलेल्या चित्राची पसंति करण्यांत आली आहे.

## सहकारी चळवळ आणि भारतांतील तिची प्रगति

( श्री. के. एल. पंजाबी, भारत सरकाच्या
शेतकी खात्याचे कार्यवाह )

दुसरें महायुद्ध संपल्यानंतरच्या काळांत औद्योगिक उत्पादनांत युद्धपूर्वकालीन प्रमाणापेक्षां वाढ झाली असली तरी शेतकी उत्पादन तितकें वाढलेलें नाहीं. आतिपूर्वेकडील राष्ट्रांचें शेतकी उत्पादन अद्यापि युद्धपूर्व सरासरीच्या ९२ टक्केच आहे. १९४९-५० चे आंकडे पाहिल्यास अन्नपिकांचें उत्पादन युद्धपूर्व सरासरीच्या ९४ टक्केच आहे, तर इतर पिकांचें उत्पादन सुमारें १४ टक्क्यांनीं कमीच असल्याचें दिसून येतें. १९४८–४९ चें तांदुळाचें जागतिक उत्पादन अंदाजें १४४·५ दशलक्ष मेट्रिक टन होतें, तर १९३४–३८ या काळांत तें सरासरी १४७·५ दशलक्ष. मेट्रिक टन होतें. आशिया खंडाच्या बाबतींत हेच आंकडे अनुक्रमें १३५ व १४१·२ दशलक्ष टन असे आहेत. मात्र गेल्या दशकांत भात खाणाऱ्या राष्ट्रांतील लोकसंख्या सुमारें १० टक्के वाढली आहे. याचा अर्थ असा कीं, दर माणशीं अन्नाचा पुरवठा युद्धपूर्व काळाच्या अवघा ८८ टक्के पडतो. वस्त्राचेंही उत्पादन अद्यापि युद्धपूर्व काळाइतकें होऊं लागलेलें नाहीं.

१९४९ च्या सुरवातीस चलनवाढीचा ताण थोडा कमी वाटूं लागला होता हें खरें. पण कोरियन युद्ध पेटल्यापासून शेतकी माल व इतर कच्च्या मालाचे भाव कडाडूं लागले आहेत. आवश्यक वस्तूंचा तुटवडा व चलनवाढीच्या दुष्टचक्राचें भय यांमुळें बहुतेक सर्व राष्ट्रांना युद्धकालीन नियंत्रणें अद्यापि कायम ठेवावीं लागलीं आहेत. गेल्या युद्धापासून उद्‌भवलेल्या जागतिक बाजारपेठेंतील या अस्थिरतेस, बहुसंख्य राष्ट्रांना त्यांचें औद्योगिक उत्पादन, शेती सुधारणा व जनतेस अन्नपुरवठा यांसाठीं आवश्यक अशा त्यांच्या आयातीच्या गरजा भागतील इतकी निर्यातीची पातळी राखतां आलेली नाहीं, हें एक मुख्य कारण आहे. बहुतेक सर्व राष्ट्रांच्या शक्ति उत्पादन वाढविण्यांत, भाववाढीस आळा घालण्यांत आणि आरोग्याच्या किमान गरजा भागतील एवढ्या प्रमाणांत तरी अन्नाचा दर्जा राखण्याचे प्रयत्न करण्यांत खर्च होत आहेत. या प्राथमिक स्वरूपाच्या गोष्टी पार पाडण्याच्या हेतूनेंच सारें अर्थकारण चाललें असून त्याचेवर नियंत्रण ठेवण्यांत आलें आहे.

या कामांत सहकारी संस्थांनीं उल्लेखनीय कामगिरी केली आहे. एकतंत्री राष्ट्रांप्रमाणेंच लोकशाही राष्ट्रांतही त्यांची चांगली वाढ झाली आहे. याचें प्रमुख कारण म्हणजे चळवळीच्या सध्यांच्या उत्क्रांतीच्या अवस्थेंत तिनें भांडवलशाही चौकट स्वीकारली असली तरी तिला सामाजिक स्वरूप प्राप्त झालें आहे.

### प्रगति

युद्धकालिन व तदनंतरची परिस्थिति आणि सरकारची सक्रीय मदत यामुळें सहकारी चळवळ सर्व बाजूंनीं प्रगतीवर आहे. १९३९ सालीं सहकारी चळवळींतील जागतिक सदस्यसंख्या अंदाजें १४३·३६ दशलक्षांचे घरांत होती तर १९४६–४७ त ती १८१·११ दशलक्षांवर गेली. म्हणजे सात वर्षांचे अवधींत सदस्यसंख्येंत २६·४ टक्के वाढ झाली. या सदस्य–संख्येपैकीं ८७ टक्के वांटा शेती व ग्राहक सहकारी संस्थांचा आहे. ग्राहक सहकारी संस्थांच्या सदस्य–संख्येंत युद्धपूर्वकाळाच्या मानानें १८·८ टक्के वाढ झालेली आहे. आर्थिक दृष्ट्या प्रगतीवर असलेल्या राष्ट्रांत तर ग्राहकांच्या सहकारी चळवळींत एक चतुर्थांश ते एक तृतीयांशपर्यंत लोकसंख्या सामील असून राष्ट्राचा १० ते २० टक्के किरकोळीचा व्यापार या संस्थांकडूनच होतो. आशियांतही या चळवळीची वाढ उठून दिसण्याइतकी म्हणजे, युद्धापूर्वीची ३,२०,००० सदस्यसंख्या १९४६–४७ त ९५,००,००० लक्षांवर जाण्याइतकी झाली आहे.

### भारतांतील प्रगति

गेल्या महायुद्धामुळें या चळवळीच्या वाढीस भारतांत फारच अनुकूल परिस्थिति प्राप्त झाली. सुरवातीस नियंत्रण यंत्रणा तयार होईपर्यंतच्या काळांत शेतकी मालाच्या किंमती खर्चापेक्षां भरमसाठ वाढत चालल्या आणि मंदीच्या काळांत कर्जे गोठल्यामुळें बंद पडलेल्या संस्थांनीं पुनः जीव धरला. देणें फेड झालें, येणें वसूल झालें आणि भांडवल गुंतविणाऱ्यांच्या इच्छेच्या आधींही त्याची फेड होऊं लागली. यानंतर, आंखूड धाग्याच्या कापसाला प्रमुख निर्यात बाजारपेठा बंद झाल्यामुळें, तागी मालाला युरोपांत बाजार बंद झाल्यामुळें आणि त्याचबरोबर परदेशांहून अन्न व इतर शेतकी माल मिळविण्यांत उत्तरोत्तर अडचणी वाढूं लागल्यामुळें देशाला त्याच्या उत्पादनाचें स्वरूप बदलणें भाग पडलें. फाळणीमुळें तर ( बऱ्याच वस्तूंचे बाबतींत ) उत्पादन आणि गरजा यांमधील तफावत वाढली. या परिस्थितीस तोंड देऊन विशेषतः अन्न व वस्त्र यांचें उत्पादन वाढविण्यासाठीं राष्ट्राच्या सर्व शक्ती एकवटाव्या लागल्या. यामुळें उत्पादकांच्या सहकारी संस्थांस सरकारची अधिक प्रमाणांत मदत मिळूं लागली आणि जनतेच्या जीवनाशीं निकटचा संबंध असल्यामुळें शेतकऱ्याला अधिक चांगल्या प्रकारें मदत करतां येण्याजोग्या या संस्थांच्या वाढीसाठीं अधिक प्रयत्न होऊं लागले. याखेरीज, भाव व उत्पादन खर्च आटोक्यांत ठेवण्यासाठीं आणि हाताशीं असलेल्या अन्नधान्य व कच्च्या मालाचें समान वांटप करण्यासाठींही सरकारचें धोरण या संस्थांना उत्तेजन देण्याचेंच राहिलें. याचप्रमाणें एकंदर जनतेच्या हिताच्या दृष्टीनें पाहतां, धान्यवसुली, नियंत्रणें आणि वांटप पद्धतीच्या कारभारासाठीं ग्राहकांच्या संस्थांवर अधिकाधिक विश्वास टाकणें क्रमप्राप्त झालें.

सध्यांच्या भारतांतील राज्यांची फाळणीपूर्व कालांतील सहकारी चळवळविषयक आंकडेवारी तयार केलेली नसली तरी अखंड भारताच्या आंकडेवारीशीं सध्यांच्या भारतांतील राज्यांच्या आंकडेवारीची केलेली तुलना पाहाण्यासारखी आहे. १९३८–३९ सालीं असलेली सहकारी संस्थांची १,२२,००० ही संख्या १९४८–४९ च्या अखेरीस १,६४,००० झाली. सदस्य संख्या ५३,७०,००० वरून १,२७,१०,००० वर म्हणजे १३६·७ टक्के वाढली. खेळतें भांडवलही १०६·४७ कोटींवरून २१९·४९ कोटींवर, म्हणजे १०६·२ टक्क्यांनीं वाढलें.

या काळांतील निरनिराळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांतील फेरबदलही उल्लेखनीय आहेत. १९३८–३९ मध्यें एकंदर प्राथमिक संस्थांशीं शेतकी संस्थांचें प्रमाण ८७.२ टक्के होतें. तें घसरून १९४८–४९ त ८२.८९ टक्के झालें. पतपेढ्यांचेंही प्रमाण ८३·२ टक्क्यांवरून ७३.३२ टक्क्यांवर आलें. शेतकी संस्थांच्या बाबतींत ‘ नॉन क्रेडिट ’ संस्थांचें एकंदर संस्थांशीं असलेलें १०·९२ टक्के हें प्रमाण १६·४४ पर्यंत वाढलें. मर्यादित जबाबदारीच्या संस्थांची वाढही अशीच उल्लेखनीय आहे. १९४८–४९ त अशा संस्थांची संख्या

अमर्यादित जबाबदारीच्या संस्थांपेक्षा १०,६९५ नी अधिक होती. शेतकी संस्थांचे, बाबतींतही १९३८–३९ मध्यें मर्यादित जबाबदारी स्वीकारलेल्या संस्थांचें प्रमाण अवघे ८ टक्के होतें, तें आतां ४१ टक्के आहे. यावरून गेल्या दहा वर्षांतील सहकारी चळवळींची दिशा कळून येईल. शेतकीव्यतिरिक्त इतर सहकारी संस्थांच्या संख्येंतील वाढीस अलिकडच्या काळांत विशेषतः शहरी विभागांत झालेली ग्राहकांच्या चळवळीची प्रगति कारणीभूत आहे. १९३८–३९त अखंड भारतांतील ग्राहक सहकारी संस्थांची संख्या जेमतेम ४०० होती, ती १९४७–४८ च्या अखेरीस केवळ सध्यांच्या भारतांतील राज्यांत ४,५४२ वर गेली. शेतकरी वर्गांतही 'नॉन क्रेडिट' संस्थांचें वाढतें महत्त्व आणि मर्यादित जबाबदाराच्या संस्थांची लोकप्रियता नमूद करण्याजोगी आहे.

### ग्रामीण बचतीस चालना देणें आवश्यक

शेतकी विकासाच्या उपायांस पैसा पुरविण्यासाठी पूर्वीपेक्षां पुष्कळ अधिक प्रमाणांत ग्रामीण बचतीला उत्तेजन देण्याची निकडीची गरज आहे. पैसा गुंतविण्यास भांडवलदार अद्यापि पुढें येत नसल्यामुळें आणि नाणेबाजार अधिकाधिक कडाडत असल्यामुळें या चळवळीवर अधिकाधिक भार पडण्याचा संभव आहे. आपल्या प्राथमिक संस्थांचा व्याजाचा दर अद्यापिही ९। टक्क्यांहून किंचित अधिकच आहे. या चळवळीस अधिकाधिक बचतीची जोड मिळाली तर या संस्थांना त्यांचे व्याजाचे दर कमी करतां येतील. यासाठी ग्रामीण बचतीसाठी मोहिम काढल्यास या संस्थांचें अंगभूत सामर्थ्य वाढण्यास साह्य होईल.

### सहकारी संस्था आणि ग्रामोद्योग


परदेशांहून अवजड यंत्रसामुग्री मिळण्यांतील अडचणी लक्षांत घेतां, देशाच्या अर्थकारणांत ग्रामोद्योगांना फार मोठें महत्त्व आहे. सर्वांगीण विकास व सर्वांना रोजगार देण्याच्या दृष्टीनें आणि भांडवल व मनुष्यबळ यांचें व्यापक प्रमाणावर वांटप होण्याच्या दृष्टीनें धंद्यांचें विकेंद्रीकरण करणें जरूरीचें आहे. ग्रामोद्योगांच्या यशस्वितेच्या आड येत असलेली मोठी अडचण म्हणजे, कच्च्या मालाचें वांटप, तांत्रिक व आर्थिक मदतीची तरतूद आणि तयार मालाची विक्री या गोष्टी करण्यासाठी योग्य संघटनांचा अभाव ही होय. सहकारी संस्था या दृष्टीनें योग्य ठरतील आणि औद्योगिक संस्थांचें जिल्हावार व प्रांतिक प्रमाणावर एकीकरण केल्यास वरगुती कारागिरांचें उत्पन्न वाढविण्यास मदत करतील.

सामाजिक अस्थैर्य आणि आर्थिक विपत्तीच्या या काळांत शांतता, अस्थैर्य आणि प्रगतीसाठीं सहकारी चळवळीस महत्त्वाची कारागिरी बजावावयाची आहे. इतर सर्व संघटनांत साध्य व साधन यांची फारकत असते. स्वार्थ आणि स्पर्धा या गोष्टी आर्थिक घडामोडींस चालना देतात असें भांडवलशाही मानते, तर नवी घडी बसविण्यासाठी कम्युनिझम वर्गविग्रहाचा फायदा घेऊं पहातो. परंतु नेहमीं म्हटलें जातें त्याप्रमाणें सहकारी चळवळ या दोघांचा सुवर्णमध्य गांठणारी नसून या दोघांच्याही फार पुढें आहे. कारण सहकारी चळवळींत ध्येयाकरितां कार्य करण्यांतच त्या ध्येयाची पूर्ती होत असते.

---

इराण–रशिआ व्यापारी करार—इराणकडून ७ हजार टन तंबाकू आणि १५ हजार टन तांदूळ घेऊन त्याच्या बदला इराणला ४७,००० टन साखर पुरविण्याचा करार उभयतां देशांत नुकताच करण्यांत आला. ह्या व्यापारी कराराच्या वाटाघाटी बऱ्याच दिवस चालल्या होत्या.


**रोखीनें व हप्त्यानें विकत मिळतात.**



जुनी मशीन देऊन नवी घ्यावयाची असल्यास आम्ही बदली करून देतों.

**पेडणेकर आणि कं. लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी, १७२ गिरगांव रोड, मुंबई ४.

तारेचा पत्ता:—PEDNECO, Bombay. फोन नं. २२७३८

**दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)**

पुणें शाखा:—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी

**भोर स्टेट बँक लि.**

[स्थापना : १९४४]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ६९,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. त्र्यं. शिंगरे, अध्यक्ष. — न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. दृ. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. — श्री. बा. ग. धंद्रुके.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठी कायम ठेवी स्वीकारते.

दराबाबत समक्ष चौकशी करावी

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजिक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठी लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.) मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.